# प्रकरण : ५

## उपसंहार

# प्रकरण ५

# उपसंहार

---

प्रस्तुत अभ्यासाच्या या अंतिम प्रकरणामध्ये या अगोदरच्या प्रकरणातील सैद्धांतिक व विश्लेषणात्मक विचारधारा एकत्र आणून त्यांच्या आधारे या अभ्यासाचे निष्कर्ष सादर करण्यात येत आहे. तसेच शहरातील पर्यावरण संरक्षणाला किती यश मिळाले आहे याचा आढावा घेतला गेला आहे.

शहरात कोणकोणत्या समस्या आहेत, त्यावर स्थानिक प्रशासनाने व स्थानिक राज्यकर्त्यांनी कोणत्या उपाययोजना केल्या हे प्रश्नावलीद्वारे समजावून घेऊन त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामधून पुढील निष्कर्ष समोर आलेले आहेत.

**१. पिण्याच्या पाण्याबाबतीत निष्कर्ष :**

कोल्हापूर शहराला पाणी पुरवठा केला जातो तो मुख्यत्वे पंचगंगा नदीतून केला जातो. परंतु पंचगंगा नदीचे पाणी इतके प्रदूषित आहे की, MPCB ने अनेकवेळा प्रशासनाला नाईलाजास्तव हा पाणी पुरवठा चालू ठेवावा लागत आहे कारण अपुरा पाणी पुरवठा, पाण्याची गळती इ. मुळे पुरेशा दाबाने पुरवठा होत नाही. जर प्रशासनाला हा पाणी पुरवठा चालू ठेवावा लागत असेल तर त्यांनी निदान नदीचे प्रदूषण रोखण्याचा तरी प्रयत्न करणे आवश्यक आहे, परंतु प्रशासनाने याकडेही कानाडोळा केलेला आहे. शहराला ज्या पाणीपुरवठा केंद्रातून पाणीपुरवठा केला जातो त्याच्या वरच्या बाजूसच जयंतीनाला व दुधाळी नाला असे दोन नाले जे शहराचे सांडपाणी वाहून आणतात ते पंचगंगा नदीस मिळतात.

त्याचबरोबर पंचगंगा नदीच्या काठावर कोल्हापूर शहराच्या आसपास पाच सहकारी साखर कारखाने आहेत. या करखान्यातून निर्माण होणारे सांडपाणी या पंचगंगा नदीत कोणत्याही प्रक्रियेविणा सोडले जात आहे. आज कोणत्याही कारखान्याकडे अशा सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा नाही. त्यामुळेही पंचगंगेचे प्रदूषण वाढत आहे. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्टद्वारे, कारखानदारांनी कारखान्याची तपासणी करणे, व त्यातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांचे व्यवस्थापन करणे बंधनकारक असताना सुद्धा हे कारखाने मात्र राजरोसपणे पंचगंगेचे प्रदूषण करीत आहेत. कारण या सहकारी कारखान्यांवर कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांचे वर्चस्व आहे. तेथील स्थानिक नेत्यांचे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न हे राजकीय पक्ष करीत आहेत. त्याचबरोबर स्थानिक प्रशासनावरही राजकीय पक्षांचा प्रभाव असल्याने या स्थानिक नेत्यांवर पर्यायाने या कारखान्यांवर कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही. प्रशासन केवळ लोकांकडून निवेदन स्वीकारून लोकांच्या तोंडाला पाने पुसत आहे.

पंचगंगा घाटावर आज कपडे धुणे, जनावरे धुणे, स्मशान भूमीत निर्माण झालेली राख पंचगंगेत सोडणे, सणासुदीच्या वेळी मुर्ती विसर्जन, निर्माल्य विसर्जन करणे याद्वारेही प्रदूषण होत आहे. पर्यावरण प्रेमी संघटनांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा प्रयत्न करूनही याला आळा घालता आलेला नाही. शहराला पाणी पुरवठा केंद्रांपैकी शिंगणापूर योजना ही अजूनही प्रशासनाने ताब्यात घेतलेली नाही कारण या योजनेत वापरलेल्या खराब वितरण नलिका, वापरलेले निष्कृष्ठ दर्जाचे साहित्य इ. त्रुटीमुळे ताब्यात घेतलेली नाही.

स्थानिक प्रशासनाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी २४८ कोटी रू अंदाजीत रकमेच्या काळम्मावाडी थेट पाईप लाईन योजनेची आखणी केलेली आहे. परंतु ही योजना राबविण्यासाठी राज्यशासनाचे एकतर १00 % अनुदान हवे आहे किंवा अल्पव्याज दराने कर्जपुरवठा झाला तरच उपरोक्त योजना अंमलात येऊ शकेल. पण

आज या योजनेसाठी कोणतेही स्थानिक नेते राज्यशासनाकडे याचा पाठ पुरावा करताना दिसत नाहीत. शुद्ध पाणी न मिळण्यास राज्यकर्त्यांइतकीच येथील जनताही जबाबदार आहे. जनतेने जर आपली मागणी प्रभावीपणे मांडली तर स्थानिक प्रशासनाला त्याबाबत निर्णय घ्यावाच लागेल.

**२. सांडपाण्याच्या बाबतीत निष्कर्ष :**

शहरात जवळ जवळ दररोज ९० द. लि. सांडपाणी निर्माण होते. हे सांडपाणी भुयारी गटारीतून जयंतीनाला व दुधाळीनाला या दोन प्रमुख ओढयांना मिळते. शहराला अनेक वेळा साथीच्या रोगांना सामोरे जावे लागले आहे. शहरातील संपूर्ण सांडपाणी हे पंचगंगेला जाऊन मिळते. त्यामुळे पंचगंगेचे प्रदूषण होते. हा प्रदूषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी हरीत पुल व हरीत तलाव या अपारंपारिक पद्धतीने सांडपाणी शुद्धीकरण योजना महापालिकेने राबविण्याचे काम मे. कोणार्क फिक्चर्स, मुंबई यांना दिलेले आहे व सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु हे काम चालू होऊन दोन वर्षे होऊनही या कामाला म्हणावा तितका वेग आलेला नाही. सध्या अशा हरीत पुल व हरीत तलावांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. पावसाळयात या योजनेला अपयश येते, त्यावर काही उपाययोजना करून या कामात गती आणली पाहीजे. आज शहरातील एकुण सांडपाण्यापैकी केवळ ४३.५ द.लि. सांडपाण्यावरच प्राथमिक प्रक्रिया केली जाते उरलेले सर्व पाणी कोणत्याही प्रक्रियेविणा पंचगंगेत मिसळते. शहरातील लोकांना आवश्यकते एवढाच पाण्याचा पुरवठा केल्यास सांडपाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. शहरात आज गरजेपेक्षा जास्त पाणी पुरवठा केला जात आहे.

कोल्हापूर शहराचे वैभव असणारे तलाव, तळी, विहीरी आज या सांडपाण्याच्या प्रभावामुळे प्रदूषित झाली आहेत. प्रशासनाने बरेच तलाव, तळी मुजवून टाकली आहेत, आज शहरात केवळ हातावर मोजण्याइतपच तळी, तलाव, विहीरी

शिल्लक आहेत. मुजवलेल्या तलावावर आज मैदाने, मंडई, शॉपिंग मॉल्स हाऊसिंग सोसायटया उभ्या आहेत. स्थानिक प्रशासनाला सांडपाण्याचा प्रश्न सोडवायचा झाल्यास जनतेला विश्वासात घेऊनच हा प्रश्न सोडविता येईल.

**३. घनकचऱ्याच्या बाबतीत निष्कर्ष :**

शहरात इतर समस्याबरोबरच घनकचऱ्याची समस्या ही महत्वाची आहे. शहरात दररोज १६५ टन कचरा निर्माण होतो. हा कचरा व्यापारी संकुल, भाजी मार्केट, हॉटेल व रेस्टॉरंट, औद्योगिक क्षेत्र, रहिवास क्षेत्र व वैद्यकिय क्षेत्रातून निर्माण होतो. या निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याची कोणतीही पद्धत महानगरपालिकेकडे नाही. त्याचबरोबर घनकचऱ्याचे वर्गीकरण करण्याची कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे या घनकचऱ्यापासून पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. मात्र महापालिकेने कसबा बावडा येथे झूम प्रकल्प सुरू करून कचऱ्यापासून खत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील घनकचऱ्याची उचल करून ती या प्रकल्पापर्यंत आणली जाते, पण बऱ्याच वेळा या प्रकल्पाच्या क्षमतेपेक्षा कमी घनकचरा पुरवला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे ठेकेदारांचे दुर्लक्ष, अपुरी वाहन व्यवस्था इ. मुळे हा प्रकल्प आज बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्याचबरोबर कसबा-बावडा येथील स्थानिक लोकांनी या कचऱ्याच्या त्रासाला कंटाळून अनेकदा आंदोलने करून हा प्रकल्प बंद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज महापालिकेपुढे शहरातील घनकचरा कुठे टाकावा? हा मोठा प्रश्न आहे. कोल्हापूर महापालिकेने महाराष्ट्र शासनाकडे मागणी केलेनुसार महाराष्ट्र शासनाने मु.पो हलसवडे, ता. करवीर येथील २५ एकर जागा मंजूर केली. मात्र ही जागाही अजून महापालिकेला मिळालेली नाही. कारण येथील लोकांनाही अशी जागा देण्याबाबत विरोध दर्शविला आहे. कसबा बावडा येथील जागा किंवा हलसवडे येथील जागा कोल्हापूर महानगरपालिकेला दिली जावी यासाठी तेथील लोकप्रतिनिधी मात्र कोणतेही प्रयत्न करताना दिसत नाहीत. तेथील स्थानिक लोकांमार्फत त्यांनी एकप्रकारे विरोधच दर्शविला

आहे. हा जागेचा प्रश्न आज सोडवायचा झाल्यास स्थानिक लोकप्रतिनिधीनीच आपापल्या मतदारसंघातील लोकांना विश्वासात घेऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे. त्याचबरोबर घनकचऱ्यावर प्रक्रिया करून ऊर्जानिर्मिती करणे हा एक अभिनव उपक्रम महापालिकेकडे आहे तो सुरू झाल्यास काही प्रमाणात घनकचरा कमी करता येईल.

शहरातील लोक वैयक्तिक स्वच्छतेकडे जरी लक्ष देत असले तरी सार्वजनिक ठिकाणी मात्र ते स्वच्छतेचा आग्रह धरत नाहीत. केरकचरा कचराकुंडीत टाकला जात नाही. प्रशासनाने घंटागाडी सुरू करूनही त्याला यश आलेले नाही.

**४. हवा व ध्वनी प्रदूषणाबाबत निष्कर्ष :**

आज शहरात वाढती वाहनांची संख्या, औद्योगिकरण इ.मुळे हवा व ध्वनी प्रदुषण होत असलेले दिसते. कोल्हापूर शहरात आजही अनेक रूढी, परंपरांचे पालन केले जाते परंतु या रूढी, परंपरावर आधुनिकतेचा प्रभाव पडल्याने प्रदूषणात भर पडत आहे. शहरात अनेक ध्वनी व हवा प्रदुषण नियंत्रणाचे कायदे, नियम करूनही त्यांची अंमलबजावणी होत नसलेली दिसते. पोलिसांनी असे प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारल्यावर लगेच स्थानिक लोकप्रतिनीधीच त्यामध्ये हस्तक्षेप करून त्यांना सोडून देतात त्यामुळे कायदा, नियमांचे म्हणावे तितके महत्व राहिलेले नाही.

शहरात औद्योगिकरणामुळे कारखान्यांची संख्या खूप आहे, पण या कारखान्यांकडे हवेत सोडल्या जाणाऱ्या धूरावर प्रक्रिया करण्याची कोणतीही यंत्रणा नाही. असे हे कारखाने हवेचे, पाण्याचे, ध्वनीचे प्रदूषण करीत आहेत. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळेही हवेच्या व ध्वनी प्रदूषणात भर पडत आहे. शहरात २००२ नंतर वृक्षलागवड करण्यात आलेली नाही. हवा प्रदूषणास कारखानदारी जेवढी जबाबदार आहे तेवढीच वाहनांची वाढती संख्या ही जबाबदार आहे. शहरात फिरवल्या जाणाऱ्या अनेक वाहनधारकांकडे PUC चे तर सोडाच

वाहनांचेही परवाने नसतात. वाहनातील धुरामुळे लोकांच्या आरोग्याला धोका पोहचत आहे. शहरातील हवा प्रदूषणाला मुख्यत्वे राजकर्तेच जबाबदार आहेत असे म्हणावे लागते कारण हवेचे प्रदुषण कारखान्यांतील धुरामुळेच वाहनांच्या धुरानेही होते. असे मोठ - मोठे कारखाने हे श्रीमंत लोकांचे किंवा राज्यकर्त्यांचे आहेत. त्याचबरोबर शहरातील वाहनांना जे पेट्रोल, डिझेल उपलब्ध करून दिले जाते ते भेसळयुक्त असल्यामुळे वाहनांच्या धुरातवाढ होते पर्यायाने प्रदुषण होते. असे पेट्रोलपंप ही राज्यकर्त्यांचेच आहेत, त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्यास येथील राज्यकर्तेच जबाबदार आहेत. तसेच येथील लोकांची प्रवृत्तीही बदलणे आवश्यक आहे. तरच या प्रश्नावर उपाय केल्यानंतर प्रभावी असा प्रभाव पडेल.

**५. लोकसहभागाबाबत निष्कर्ष :**

शहरात आतापर्यंत पर्यावरण प्रदूषण विरोधात अनेक आंदोलने केली गेली आहेत व आजही आंदोलने केली जात आहेत. परंतु या आंदोलनामध्ये सामान्य लोकांचा म्हणावा तितका सहभाग नसल्याने स्थानिक प्रशासनाला ते प्रभावित करू शकलेले नाहीत. त्याचा परिणाम म्हणजे प्रशासन अजूनही कासवाच्या गतीनेच कार्य करीत असलेले दिसते. शहरातील लोक वैयक्तिक पातळीवर स्वच्छतेचा आग्रह धरतात पण सार्वजनिक ठिकाणी मात्र विकृत प्रवृत्ती दिसून येते. वैयक्तिक जीवनातील स्वच्छतेचा आग्रह सार्वजनकि आयुष्यात नसतो. 'घर स्वच्छ ; कॉलनी गलिच्छ', 'वैयक्तिक समृद्धी, सार्वजनिक बकाली' असे चित्र दिसते. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, बेपर्वा वागणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. त्यात कुणी बाधा आणल्यास 'रस्ता काय आपल्या बापाचा आहे?' अशी विनम्र विचारपूस होते. ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. अजूनही जनसामान्यांपर्यंत जाणीवजागृती आलेली नाही व त्यादृष्टीने राज्यकर्ते व प्रशासनही कोणतेही प्रयत्न करीत नाही.

शहरातील लोकांना योग्य मार्गदर्शन केल्यास शहरातील बऱ्याच समस्या ज्या कारणांमुळे निर्माण होतात त्या कारणांवर आळा घालता येईल. लोकांना आज पर्यावरणाचे महत्व पटू लागले असले तरी जोपर्यंत त्यांची प्रवृत्ती बदलणार नाही तोपर्यंत पर्यावरण संरक्षण करणे अशक्य आहे.

**६. स्थानिक नेतृत्वाबाबरत निष्कर्ष :**

शहरातील नेतृत्वाचा विचार केल्यास श्री. भास्करराव जाधव, श्री. अण्णासाहेब लठ्ठे, श्री दत्ताजीराव माने व छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वानंतर शहराला प्रगतीवर नेणारे दुसरे नेतृत्व आजपर्यंत मिळाले नाही. आजचे स्थानिक नेतृत्व हे अकार्यक्षम असे आहे. आज व्यवस्थापनामधील अक्षम्य दुर्लक्ष, लहरीपणा व इच्छाशक्तीची कमतरता हे दोष नेतृत्वाजवळ आहेत. प्रशासनाने अनेक योजनांद्वारे शहराचे पर्यावरण सुधारण्याचे आराखडे तयार करूनही प्रभावी नेतृत्वाच्या अभावी ते तसेच पडून आहेत. नेतृत्व जेवढे प्रभावी, कार्यक्षम असेल तेवढे प्रशासन यशस्वी होते, परंतु येथे प्रभावी नेतृत्वाच्या अभावामुळे येथील प्रशासन अपयशी ठरत आहे. नेतृत्वाला केवळ सत्ता हवी आहे परंतु त्यातूनच येणारी जबाबदारी स्वीकारण्यास ते तयार नाहीत. महापालिका प्रशासन असेल किंवा लोकप्रतिनीधी असतील जनतेचे प्रश्न सोडविण्याबाबत उदासीन आहेत. महापालिकेत सत्ता प्राप्त करण्यावरून अनेक वेळा संघर्ष झाला आहे. एकीकडे स्थानिक प्रशासन रंकाळा महोत्सवासारखे उत्सव साजरे करण्याचे आयोजन करते, पण तोच रंकाळा प्रदूषणमुक्त, जलपार्णीमुक्त रहावा याकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

सार्वजनिक स्वच्छता ही राजकीयदृष्टया फायदेशीर ठरू शकत नाही. असा समज कदाचित राजकीय धुरीणांचा असावा. युवा असोत वा अनुभवी नेते कुणीही स्वच्छतेचा मुद्दा ऐरणीवर आणलेला नाही. राजकीय नेत्यांनी गेल्या २०-२५ वर्षात

वैयक्तिक अथवा सार्वजनिक वर्तन सुधारण्याचा काडीमात्र प्रयत्न केला नाही. बँका, साखर कारखाने, पेट्रोलपंप ताब्यात असताना शहर मात्र घाणेरडं राहतं. याचाच अर्थ ती बाब नेत्यांच्या दृष्टिने नगण्य आहे. त्यामुळे सर्व राजकीय नेते सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी अधिकाऱ्यांवर सोपवून मोकळे होतात.

**७. स्थानिक पर्यावरणप्रेमी संघटनाबाबत निष्कर्ष :**

शहरामध्ये आज अनेक लहान मोठया पर्यावरण प्रेमी संघटना आहेत यामध्ये प्रामुख्याने विश्व प्रकृती निधी (WWF) व रंकाळा संवर्धन संघर्ष समिती या १९८७ पासून कार्यरत आहेत. शहरात आज अनेक पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयाही या संघटनांच्या सदस्या आहेत. शहराच्या दृष्टीने या संघटनांनी अनेक महत्वाची पर्यावरण विषयक कार्ये केलेली आहेत. उदय गायकवाड, सुहास वायंगणकर, डॉ.जय सामंत, जीवन बोडके इ.नी कोल्हापूर शहराच्या पर्यावरणाला वेगळे वळण देण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. परंतू यांचे प्रयत्न अजूनही कमी पडत असलेले दिसतात कारण लोकांचा मिळणारा प्रतिसाद व निगरगट्ट राज्यकर्ते होय. एखाद्या प्रश्नावर संघटनांनी सामुहीक प्रयत्न केल्यास सदस्यांनी वैयक्तिक हेवे दावे बाजूला ठेवून कार्य केल्यास परिणामकारता वाढेल व शहरातील सर्व नागरिकांना स्वच्छ व सुंदर पर्यावरणाचा लाभ घेता येईल.